नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ९३ | Issue - 93 | वार बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ | Blow- Wednesday Date 20 August 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# महाराष्ट्रात तूफान पाऊस; मराठवाड्यात नद्यांना पूर

## राज्यभरात १६ जणांचा मृत्यू; शेतात पाणी-मुंबईत रेल्वे, लोकल विस्कळीत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राची राजधानी मुंबईसह राज्यभरात पावसाने धुमाकूळ घातला असून मुंबई, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात धुव्वादार पाऊस सुरू आहे. कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक नद्यांना पूर आला असून लातूर, नांदेड जिल्ह्यात पावसाने मोठं नुकसान झालं असून मनुष्यहानी व जनावरेही दगावल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने राज्यभरात १६ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात, मराठवाड्यात ११ जणांचा मृत्यू झाला असून नांदेड जिल्ह्यात पूरग्रस्त परिस्थितीमुळे ९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे नांदेड जिल्ह्यात पोहोचले आहेत. तर, मुख्यमंत्र्यांनीही मुंबईसह महाराष्ट्रातील पूरस्थितीचा (ऋश्रेव) आढावा घेतला आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टी झाली असून पिकं पाण्याखाली गेली आहेत. तर, मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली असून मुंबईतील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेचं दिसून आलं. राज्यातील अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने विसर्ग देखील सुरू झाला आहे.

मुंबईसह उपनगरात कालपासून मुसळधार पाऊस सुरू असून हवामान वेधशाळेचा अंदाज खरा ठरला आहे. त्यानुसार, आज शाळा आणि महाविद्यालयांना आधीच सुट्टी देण्यात आली होती. तर, लोकलसेवा खोळंबल्याने मुंबईतील चाकरमान्यांचे मात्र चांगलेच हाल झाले. मुंबईत ठाण्याकडून सीएसएमटीकडे जाणारी लोकलसेवा काही तास बंद राहिली. मुंबईच्या मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या ट्रांस हार्बर मार्गिकेवर पाणी असल्याने अनेक गाड्या या रेल्वे रुळाकर थांबल्या, त्यामुळे प्रवाशांची मोठी गर्दी आणि गैरसोय झाली होती. मुंबईसह, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाने हाहाकार उडाला आहे. दरम्यान, रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून मुंबई-पुणे-मुंबई जाणाऱ्या अनेक ट्रेन रद्द झाल्या आहेत.

सतत पडणाऱ्या पावसामुळे ठाणे शहरातील अनेक रस्ते जलमय झाले आहेत. ज्या रस्त्यांवर पाणी साचले आहे, ते रस्ते रहदारी आणि वाहतुकीसाठी प्रशासनाकडून बंद करण्यात आले आहेत. तसेच ठाण्यातील तलावांनी पाण्याची पातळी ओलांडली असून तलावातील पाणी रस्त्यावर आलेले पाहायला मिळत आहे. उपवन तलावाने देखील पाण्याची पातळी ओलांडली असून प्रशासनाने आसपासच्या परिसराला सतर्कतेचा इशारा दिला आहे. या उपवन तलावाकाठी दररोज पावसाचा आनंद लुटण्यासाठी येत असतात मात्र पाण्याच प्रमाण जास्त असल्याने.ठाणे महापालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने नागरिकांना या ठिकाणी येण्यास बंदी घातली असून पर्यायी रस्त्याचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पालघर जिल्ह्यात पहाटेपासून मुसळधार पाऊस सुरू असून या पावसाचा परिणाम नदी नाल्यांवर झाला असून जिल्ह्यातील नदीला ओसंडून व्हायला सुरुवात झाली आहे. मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे जिल्ह्यातील भात शेती ही पाण्याखाली गेली असून सूर्या देहर्जे वैतरणा या सर्वच नद्या दुसरीकडून व्हायला सुरुवात झाली आहे. सूर्या नदीला मोठा पूर आला असून सूर्या नदी इसारा पातळी ओलांडण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे नदी काठावर असलेल्या नागरिकांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे

**रायगडमध्ये नद्यांनी ओलांडली पातळी**

रायगड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळतोय, सतत कोसळणाऱ्या पावसाने जनजीवन विस्कळीत झालेय. जिल्ह्यातील प्रमुख नद्या दुथडी भरून वाहतायेत, तर काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडलीय. पाली खोपोली राज्य महामार्गावर पाली आंबा नदी पुलाजवळ पाणी साचल्याने वाहतुकीला फटका बसला असून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी तळी साचल्याने वाहतूक धीम्या गतीने सुरू आहे. रायगड जिल्ह्याच्या रोहा शहरातील कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून या नदीवरील दोन्ही पूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून पुलाच्या दोन्ही बाजूस बॅरिकेट्स लावून पोलीस बंदोबस्त ठेवला आहे. रोहा तहसीलदार व नगरपरिषदेकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले असून फक्त अत्यावश्यक असल्यासच बाहेर पडा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**लोणावळ्यात १० तासांत १५० मिलिमीटर पाऊस बरसला**

पुणे जिल्ह्यातही सकाळपासून पावसाने जोरदार हजेरी लावली असून पर्यटननगरी लोणावळ्यात आज पावसाने तुफान बॅटिंग केली आहे. अवघ्या दहा तासांत १५० मिलिमीटर पाऊस बरसलाय. सकाळी ७ ते सायंकाळी ५ दरम्यान पावसाने विक्रमी नोंद केलीये. यंदाच्या मोसमात दहा तासांत पहिल्यांदाच पावसाने अशी बॅटिंग केलीये. घाटमाथ्यावर रेड अलर्ट जारी केल्यानं अन तसा पाऊस ही बरसत असल्यानं लोणावळ्यातील सर्व शाळांना उद्या आणि परवा सुट्टी ही जाहीर केलेली आहे.

**साताऱ्यात कोयना १०० टीएमसी भरले, गावांचा संपर्क तुटला**

साताऱ्यातील कोयना धरण १०० टीएमसी भरले असून धरणातून ८० हजार ५०० पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. कराड-चिपळूण राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आलाय, पाटण तालुक्यातील नेरळे, मूळगाव, संगमनगर पूल पाण्याखाली गेले आहेत. सातारा जिल्ह्यातील कोयना, धोम आणि कण्हेर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्याने, कोयना, वेण्णा आणि कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसात सहाव्यांदा कोयना धरणाचे दरवाजे उचलून ११ फुटावर नेण्यात आले आहेत. सध्या ८०, हजार ५०० क्युसिक पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. धोम धरणातून ८ हजार ६५९ क्युसेक इतका विसर्ग कृष्णा नदी पात्रात होत असून कण्हेर धरणातून ६ हजार ४०० पाण्याचा विसर्ग वेण्णा नदीपात्रात केला जात आहे. त्यामुळे कोयना, वेण्णा आणि कृष्णा नदीच्या पाणी पातळी वाढली आहे. पश्चिम भागातील अनेक नद्यांवरील पूल बंधारे हे पाण्याखाली गेले आहेत. पाटण तालुक्यातील मुळगाव , संगमनगर धक्का पूल त्याचबरोबर पाटण तालुक्यातील अनेक गावातील पूल पाण्यातले गेल्याने संपर्क तुटला आहे.

**मुंबईत ३०० मिमि पाऊस - मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढील काही तास मुंबईत पावसाचा जोर कायम राहिल्यास आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होण्याचे संकेत दिले. मिठी नदी धोकादायक पातळीवर गेल्याने आपल्याला ४००-५०० लोकांना आपल्याला हलवावं लागले. मिठी नदीच्या पातळीवर प्रशासन सातत्याने लक्ष ठेवून आहे. गेल्या काही तासांमध्ये मिठी नदीची पातळी कमी झाली आहे. मात्र, येत्या काही तासांमध्ये मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने आपण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. आपण सगळ्या गोष्टी नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यासाठी आपण सरकारी आणि खासगी कार्यालयांना सुट्टी आणि वर्क फ्रॉम होमचे आदेश दिले आहेत. आज संध्याकाळी समुद्राला भरती येणार आहे. तेव्हा पावसाची परिस्थिती काय असेल ते बघावे लागेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

**विदर्भात ५० गावांचा संपर्क तुटला**

विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आणि बुलढाणा या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी करण्यात आला होता.

गडचिरोली जिल्ह्यासह लगतच्या परिसरात सोमवारी सायंकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासात १२ तालुक्यात ५२.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून १५ मंडळात मुसळधार तर १० मंडळात अतिमुसळधार पावसाची नोंद झाली. या पावसामुळे सद्यस्थितीत १० जिल्हा मार्ग बंद असून पर्लकोटा नदीच्या पुरामुळे भामरागड-आल्लापल्ली हा राष्ट्रीय महामार्गही बंद झाला आहे. परिणामी तालुक्यातील ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. मुसळधार पावसाने गडचिरोली शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले असून आपत्ती व्यवस्थापन करणारी नगरपालिकाच पाण्याखाली गेल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, हवामान विभागानुसार २० तारखे पर्यंत विदर्भातील दक्षिणी जिल्ह्यांमध्ये म्हणजेच यवतमाळ चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात दमदार पावसाची शक्यता आहे. २१ ऑगस्ट पासून मात्र पावसाचा जोर कमी होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

### मराठवाड्यात पावसाने ११ जणांचा बळी

**मराठवाड्यात १४ ऑगस्टपासून मराठवाड्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाला आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये जीवितहानी देखील केली आहे. मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत ११ लोकांचा बळी गेला आहे. ४९८ छोट्या मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर ३५० पेक्षा अधिक घरांची आणि गोठ्यांची पडझड झाली आहे. सोबतच ११५४ गावांना पावसाचा फटका बसला आहे. मराठवाड्यातील ४ लाख ३८हजार ४५१ शेतकरी पावसामुळे बाधित झाले आहे. तसेच ३ लाख ५८ हजार ३७०.५५ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाला आहे.**

### नांदेडमध्ये ५ जणांचा मृत्यू

**नांदेडमधील लेंडी नदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. धरणामध्ये वीस फूट पाणी वाढलं, जे काही नागरिक जागे होते त्यांनी गावकऱ्यांना जागं केलं. परंतु काही लोक गावात अडकली होती. त्या दुर्घटनेत गावातील चार महिला आणि एका पुरुषाचा मृत्यू झाला आहे. येथील परिस्थिती अतिशय गंभीर आहे. गावातील घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सगळं काही होतं ते तिथेच राहिलं, त्यामुळे शासनाची जबाबदारी वाढली आहे. नांदेडमध्ये कालच्या पावसाने ५ बळी गेले असून आज २ मृतदेह शोधण्यात आले आहेत.**

---

**अतिवृष्टीचा अंदाज** | **प्रशासनाला अलर्ट राहण्याचे आदेश**

# ठाणे, साताऱ्यासह ५ जिल्ह्यात शाळांना सुट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात हवामान खात्याने वर्तवलेला पावसाचा अंदाज लक्षात घेता, काही जिल्ह्यात २ दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार, आज मुंबईसह कोकणात मुसळधार पाऊस झाला. त्याच पार्श्वभूमीवर उद्या २० ऑगस्ट रोजीही अतिवृष्टीचा इशारा पाहता ठाणे, पालघर, नवी मुंबई, रत्नागिरी आणि सातारा जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीचा इशारा पाहता खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. इतर जिल्ह्यातील तेथील परिस्थिती पाहून शिक्षणाधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यात येईल. मुंबईसह महाराष्ट्रात आज पावसाने सर्वत्र दाणादाण उडवून दिली होती. तर, मुंबईत वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमंडली होती. चाकरमान्यांचे मोठे हाल झाले. दरम्यान, उद्याही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.



ठाण्यासह रत्नागिरी, पालघर जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु असल्याने खेड तालुक्यातील जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली आहे. चिपळूण येथील वाशिष्ठी, संगमेश्वरमधील शास्त्री, लांजामधील काजळी आणि राजापूर येथील कोदवली नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होवू नये, याकरिता जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सरकारी व खासगी प्राथमिक, माध्यमिक, जिल्हा परिषद, नगरपालिका, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये तसेच आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना उद्या बुधवार २० ऑगस्ट रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी एम.देवेंदर सिंह यांनी हा आदेश काढला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात उद्या २० ऑगस्ट रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आलेला आहे. जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होवू नये, याकरिता जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सरकारी व खासगी प्राथमिक, माध्यमिक, जिल्हा परिषद, नगरपालिका, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये तसेच आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना उद्या बुधवार २० ऑगस्ट रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

---

# मुंबईत मोनोरेल अडकली, प्रवाशांमध्ये घबराट; दोन तासानंतर झाली सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईला आज सकाळपासून पावसाने झोडपून काढलेलं आहे. पावसामुळे मुंबईकर अक्षरश: हतबल झालेला असताना संध्याकाळच्या सुमारास आणखी एक अनपेक्षित घटना घडली.



मुसळधार पावसामुळे सकाळपासून लोकल ट्रेन विस्कळीत झाली होती. त्यानंतर संध्याकाळी मोनोरेलला मोठा फटका बसला. भक्तीपार्क ते म्हैसूर कॉलनी दरम्यान एक मोनोरेल थांबली. संध्याकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास ही गाडी स्तब्ध झाली. गाडी थांबल्यानंतर आतमधील एसीदेखील बंद झाली. बराच वेळ झाला तरी गाडी सुरु झाली नाही. तसेच गाडीतील एसीदेखील बंद होती. त्यामुळे नागरिकांना श्वास घेण्यास अडचण होऊ लागली. यामुळे गाडीतील प्रवासी जोरजोरात ओरडू लागले. आम्हाला बाहेर काढा, असं नागरीक ओरडू लागले. अनेक प्रवाशांनी पोलीस, अग्निशामक दलाला फोन केला. अनेक प्रवासी गाडीच्या दरवाज्यांजवळ आले. त्यांनी दरवाजा खोलण्याचादेखील प्रयत्न केला. पण त्यांना त्यात यश आलं नाही. या दरम्यान अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झालं. अग्निशामक दलाच्या तीन क्रेन घटनास्थळी दाखल झाल्या. मोनोरेलचा खालचा परिसर पूर्णपणे ब्लॉक करण्यात आला. अग्निशामक दलाचे जवान, पोलीस मोठ्या संख्येत तिथे उपस्थित झाले. अग्निशामक दलाकडून मोनोरेलचा आपत्कालीन दरवाजा तोडण्याचे प्रयत्न अग्निशामक दलाकडून करण्यात येत होता. या दरम्यान प्रवाशांनी मोनोरेलचा आतून काच फोडला. त्यातून तातडीने अग्निशामक दलाच्या क्रेनने प्रवाशांना खाली रेस्क्यू करण्यात येत आहे. अग्निशानक दलाच्या क्रेनमधून प्रवाशांना बाहेर काढण्यात येत आहे. सध्या अध्यापेक्षा जास्त प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. एसी बंद असल्यामुळे अनेकांना श्वास घेण्यास अडचण झाली. दोन महिलांना जास्त त्रास झाला. त्या भेदरलेल्या होत्या. त्यांना रेस्क्यू केल्यानंतर त्यांची तातडीने वैद्यकीय तपासणी करण्यात आली. प्रत्येक प्रवाशाची वैद्यकीय तपासणी प्रशासनाकडून केली जात आहे. ज्यांना श्वसनाचा त्रास होत आहे त्यांना जवळच्या रुग्णालयात नेलं जात आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत आपली प्रतिक्रिया दिली आहे. काही तांत्रिक कारणाने चेंबूर आणि भक्तीपार्क दरम्यान एक मोनोरेल अडकून पडली आहे. एमएमआरडीए, अग्निशमन दल आणि महापालिका अशा सर्वच यंत्रणा त्याठिकाणी पोहोचल्या आहेत. सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे कुणीही काळजी करु नये, घाबरून जाऊ नये. सर्व प्रवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात येईल. सर्वांनी संयम ठेवावा, ही माझी सर्वांना विनंती आहे. मी एमएमआरडीए आयुक्त, महापालिका आयुक्त, पोलिस आणि सर्वच यंत्रणांशी संपर्कात आहे. हा प्रकार का घडला, याचीही चौकशी करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी दिली.

## संपादकीय....

# अतिवृष्टी

महाराष्ट्राची राजधानी मुंबईसह राज्यभरात पावसाने धुमाकूळ घातला असून मुंबई, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात धुव्वादार पाऊस सुरू आहे. कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक नद्यांना पूर आला असून लातूर, नांदेड जिल्ह्यात पावसाने मोठं नुकसान झालं असून मनुष्यहानी व जनावरेही दगावल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने राज्यभरात १६ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात, मराठवाड्यात ११ जणांचा मृत्यू झाला असून नांदेड जिल्ह्यात पूरग्रस्त परिस्थितीमुळे ९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे नांदेड जिल्ह्यात पोहोचले आहेत. तर, मुख्यमंत्र्यांनीही मुंबईसह महाराष्ट्रातील पूरस्थितीचा आढावा घेतला आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टी झाली असून पिकं पाण्याखाली गेली आहेत. तर, मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली असून मुंबईतील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेचं दिसून आलं. राज्यातील अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने विसर्ग देखील सुरू झाला आहे. शाळा आणि महाविद्यालयांना आधीच सुट्टी देण्यात आली होती. मुंबईसह, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरीसह अनेक जिल्ह्यातही पावसाने हाहाकार उडाला आहे.



# जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुला मुलींची शाळा वागदरी येथे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा.....

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुला मुलींची शाळा वागदरी येथे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहामध्ये साजरा करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी समाजसेवक श्री मारुती शिंदे हे होते सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मराठी मुलींच्या शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गजानन सुरवसे व मुलांच्या शाळेचे पालक श्री सोमा स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मराठी मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ रेखा सोनकवडे मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. व सर्वांकडू ध्वजवंदन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांकडून समूह नृत्य करण्यात आले व तसेच यावेळी शाळेतील मुला मुलींची भाषणे झाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलर कंपनीचे डायरेक्टर श्री मनोज काळे श्री समाधान पडुळकर ग्रामपंचायत सदस्य शारदाबाई रोटे एस एस शेळके प्रशालेचे खजीनदार शाळा प्रेमी व्यक्तीमत्व श्री महादेव पाटील श्री विठ्ठल पाटील शाळा व्यवस्थापन समिती मुलीचे अध्यक्ष श्री. गजानन सुरवसे, शिक्षण प्रेमी व समाजसेवी व्यक्तिमत्व श्री शिवशरणप्पा सुरवसे, समाजसेवक श्री. मारुती शिंदे श्री सोमा स्वामी उपस्थित होते. कार्यक्रमांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्याचां शाळेतर्फे सत्कार करण्यात आले सोलर कंपनीकडून विद्यार्थ्यांना बिस्किट व पेन चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमावेळी आपले विचार व्यक्त करताना समाजसेवक श्री शिवशरणप्पा सुरवसे यांनी आपल्या मराठी मुला मुलींच्या शाळेसाठी सोलार कंपनीने सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या मुलांना सर्व सुविधा निर्माण झाले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच यावेळी अध्यक्षीय भाषण करत असताना समाजसेवक श्री. मारुती शिंदे यांनी सांगितले की, आपला हा भारत देश असंख्य शूरवीरांच्या अमर बलिदानाने स्वातंत्र झालेला आहे. आपण या बलिदानाची आठवण ठेवून आपल्या देशाला सर्वच बाबतीमध्ये सर्वोच्च स्थानी घेऊन जाणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे विचार व्यक्त केले. या वेळेला शाळेचे सह शिक्षक शिक्षिका पालक वर्ग व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुलींच्या शाळेतील मुख्याध्यापक श्री बाबासाहेब बनसोडे सर यांनी केले आभार श्री बागवान सर यांनी मानले. अशाप्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा वागदरी येथे मोठ्या उत्साहामध्ये भारतीय स्वतंत्र दिन साजरा करण्यात आला.

# धम्मचळवळीचा झेंडा खांद्यावर घेऊन चालणारा कार्यकर्ता : बी. आर थोरात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे शहरातील ताडीवाला रोड भागातील भारतीय बौद्ध महासभेचे सामाजिक कार्यकर्ते व बौद्धाचार्य बी.आर. थोरात यांचे दुःखद निधन..... समीक्षा फाउंडेशन, आष्टा कासार येथील लुंबिनी बुद्धविहार आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालयच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली..!

बी. आर. थोरात सामान्य सामाजिक कार्यरत होते. अनेक वर्ष बौद्ध चळवळीमध्ये, ताडीवाला रोड येथील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रामध्ये त्यांनी हिरीरीने सहभाग घेतला आहे. या भागातील प्रत्येकाच्या सुखदुःखात त्याने आपला कृतिशील सहभाग नोंदवला आहे. गेली ४०-५० वर्ष या भागात रहिवासी म्हणून राहत होते त्यामुळे तिथल्या लोकांच्या सामाजिक समस्या व नेमके प्रश्न त्यांना माहित होते.

त्याप्रमाणे त्यांनी माणसाचा व समाजाचा विकास व्हावा याकरिताच धडपड व प्रयत्नशील होते.

बुद्ध धम्म चळवळीत बौद्धाचार्य होऊन बौद्ध धम्माचा प्रसार करणे जिकिरीचे व कठीण काम आहे. असे सोपे नाही. परंतु थोरात हे ज्येष्ठ व जुने कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते. कोणत्याही छोट्या-मोठ्या कार्यक्रमात बुद्ध वंदना व बुद्ध पूजा घेण्यासाठी लोक त्यांना बोलवत. लग्न असो, गृहप्रवेश असो, वाढदिवस असो किंवा एखाद्याचा अंत्यविधी असो त्या विधी करता थोरात हे हजर राहत असत. तीस वर्षांपूर्वी बौद्धाचार्यांची पुष्कळ कमी होते. हिंदू धर्म विषमतावादी आहे. तो चातुरवरने शिकवतो. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र याची समाज रचना शिकवतो. शूद्र हा सर्वात कनिष्ठ घटक आहे. हक्कात विषमता, अधिकारात विषमता, व्यवसायात विषमता, शिक्षणात विषमता, म्हणून बाबासाहेबांनी सर्व मनुष्य मात्र समान मानणारा समता स्वातंत्र्य बंधुता न्याय यावर आधारित धम्म दिला. विज्ञाननिष्ठ व मानवतावादी बौद्ध धम्म अनुयायांना दिला. हे त्यांचे महत्त्व, बाबासाहेबांच्या २२ प्रतिज्ञा सांगत राहिले. मोठेपण लोकांना सांगत राहिले. समाज प्रबोधन करत राहिले.

त्यावेळी आर आर कांबळे, सोन्याबा मारुती कांबळे, चोळाप्पा कांबळे, भीमराव कांबळे, सूर्यवंशी, इत्यादी कार्यकर्ते कार्यरत होते. मराठवाड्यातील कार्यकर्त्यांची फळी एकजूट होती. कार्यकर्ते प्रामाणिक, निष्पक्ष, निस्वार्थीपणे समाजात काम करत.

ताडीवाला रोड म्हटलं की पुणे शहरातली विशाल झोपडपट्टी, महाराष्ट्रातून, विदर्भ, मराठवाडा,कोकण, नांदेड, परभणी, बीड, अहमदनगर येथून आलेले गोरगरीब अनुयायांनी इथे वास्तव्य केलं. त्यांची पुढची पिढी शिकली, नोकरी शिक्षण ही लागलं यामुळे बराचसा आंबेडकरी वर्ग इथे स्थिर झाला.

तेव्हा राजा बहादुर मिल कार्यरत होती. लोक रेल्वे ससूनचा दवाखाना व इतर सेंट्रल बिल्डिंगमध्ये शिपाई, क्लार्क, सुपरटेंडट, क्लास टू ऑफिसर, असे कार्यरत होते . त्यावेळी तडीवाला रोड परिसरात एस एस रामटेके हे सेंट्रल रेल्वेचे मोठे इंजिनियर होते. पुण्यातील औद्योगीकरणामुळे शोषक आणि शोषित यांचा वर्ग ही वाढला. जशी झोपडपट्टी वाढू लागली तसे बेरोजगारी, बकालपणा, भणंगगिरी दारिद्र्य यांच्या बरोबरीने गुंडगिरी, हिंसाचार, व्याभिचार याने आपले हातपाय पसरायला सुरुवात केली. नागरी समस्या वाढू लागल्या.

अशा वातावरणात, आंबेडकर



चळवळीमध्ये समता मूल्य प्रस्थापित समता मूल्य प्रतिष्ठापना करण्यासाठी मिशनरीवृत्तीने कार्यकर्ते काम करत. मराठवाड्यातील कार्यकर्ते परिवर्तन चळवळीत आवर्जून सहभागी असत. महिला व कार्यकर्त्यांनी आंबेडकर चळवळ जिवंत ठेवली. या भागातील परिस्थिती हळूहळू बदलायला सुरुवात झाली. गर्भ श्रीमंत उमेदवारांनी नगरसेवक आमदार पदे लाटली. इथे काही आपल्या मागासवर्गीयातून नगरसेवक झाले. ते केवळ या कार्यकर्त्यांच्या त्याग आणि कष्टावरच. तसा पैसे मिळवण्यासाठी काही लोकांनी उमेदवारी अर्ज भरण्याचा नवा उद्योग सुरू केला. ज्याच्याकडे जास्त पैसा तो राजकारणात येऊ लागला. पैसेवाल्याजवळ सत्ता मिळवण्यासाठी निवडणूक ही पायरी मिळाली तोच त्या पायरीचा मालक होऊ लागला. आणि सत्तेत जाऊन तोच अधिक पैसेवाला झाला. ज्याच्याकडे पैसा आहे त्याच्याकडे सत्ता आहे आणि ज्याच्याकडे सत्ता आहे तो अधिक पैसेवाला असे एक चक्र फिरू लागले या तळागाळातील समाजातील सामान्य कार्यकर्ता देखील अस्वस्थ झाला. आपल्याकडे मनुष्यबळ आहे, विचार आहे, संघटन आहे, मग आपण निवडून का येऊ शकत नाही ? या वोट बँकेचे आपण सत्तेत रूपांतर करू शकतो का? हे आव्हान समजून आजही तो कार्यकर्ता झगडत आहे. परंतु या सत्ताचक्रातून प्रामाणिक कार्यकर्ता बाहेर फेकल्याचे दिसून येते.

झोपडपट्टी अनेक समस्यांना लोकांना तोंड द्यावे लागते प्रचंड राजकारण असते राजकारणाबद्दल प्रचंड नाराजी असते राजकीय नेते व कार्यकर्त्याबद्दल देखील आपण वाईट बोलतो. परंतु अनेक प्रश्न हे शेवटी राजकीय क्षेत्रातील लोकांकडूनच सोडवायचे असतात आपल्याला नेता हवा असतो. आपल्याला बदली हवी असते. आपल्याला प्रमोशन हवा असतं. आपल्या सत्तेसाठी भूखंड हवा असतो. संस्थेसाठी भूखंड हवा असतो. आपल्याला शाळेची परवानगी पाहिजे असते. अनुदान पाहिजे असते. शाळा कॉलेजमध्ये मुलांना प्रवेश हवा असतो. नळ कोंडाळे हवे असते. कोणांशी भांडण झाले की पोलीस चौकीतून सोडवण्यासाठी जामिन हवा असतो, ओळख हवी असते. आपल्याला गावासाठी रस्ता पाहिजे असतो. स्मशानभूमी हवे असते. समाज मंदिर हवा असतं. घरकुल योजनेत घर हव असतं. एसटी पाहिजे, रेशनदुकान, परमिट, पाणी पाहिजे असते. बी-बीयाने हवं पाहिजे असते, सारं सारं पाहिजे असते. परंतु राजकीय नेता पाहिजे असतो. अनेकदा त्याचा आधार असावा लागतो. यासाठी लोक राजकीय नेत्यांच्या मागे धावतात.

लोकशाहीत मेजॉरिटी गॅरेज द लॉ म्हणजे जे बहुसंख्यांक आहेत ते सत्याधारी बनतील असे आहे. १९५० च्या अगोदर जातीव्यवस्था चुकीची आहे त्यातून माणसे विभागले गेले आहेत यावर पुष्कळ यांचे एकमत झाले परंतु ब्राह्मणे तर चळवळीने जातीव्यवस्थेचा शिरोमणी ब्राह्मण वर्चस्व नाकारले होते. ग्रामीण भागात व झोपडपट्ट्यातून ज्यांच्याकडे पैसा आहे तोच उमेदवार निवडून येऊ लागला निवडणूक लढवायची तर तुमच्याजवळ संस्था हव्यात ज्यांच्याकडे जमिनी होत्या ते सहकारी चळवळीतून संस्थावाले झाले निवडणुकीला मिळणारा निधी साधने म्हणजे साखर कारखाने सूट गिरण्या दुग्धविकास सोसायट्या शाळा कॉलेजेस उभा करून त्यांना पाठबळ मिळाले त्यामुळे तेच मोठे सत्तेचे हक्कदार बनले पैसा प्रतिष्ठा सत्ता त्यांच्याजवळ एक वटली तेच तिथले आमदार खासदार बनले परंतु रोजंदारी करणारा वर्ग समाज म्हणजे ऊस तोडणी लावणी शेती सांभाळणारा बनला कारखानदार डायरेक्ट त्याचे नवे मालक बनले मग मालकाने निवडणूक लढवायची तर कोणी लढवायची मालकाने किती पाण्यासारखा पैसा खर्च केला यावर गरिबांनी नुसती चविष्ट गप्पा मारायच्या एवढेच त्यांच्या हाती राहिले.

यासाठी गावातला काय किंवा झोपडपट्टीतला काय ....उमेदवारा जवळ किंवा सामाजिक कार्यकर्त्याजवळ संस्था नाहीत, शिक्षण संस्था नाहीत, साखर कारखाने नाहीत, इतर संस्था त्याच्या हाताशी नाहीत, यामुळे संस्थापक संस्थात्मक राजकारण त्याला येत नाही, अशा परिस्थितीत पैसा नाही, जात अल्पसंख्यांक, संस्था नाहीत म्हणून निधी नाही निधी नाही म्हणून निवडून येऊ शकत नाही. डिजिटल युगात डिजिटल नेतृत्व निर्माण झाले. काळासोबत त्यांना धावता येत नाही. ही आजची परिस्थिती आहे. यासाठी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचा एक संसदीय लोकशाही पद्धतीच्या अंगाने नव्याने विचार व्हावा असे मला वाटते...!

बी आर थोरात यांना पुनश्च भावपूर्ण श्रद्धांजली !

**– डॉ. डी टी गायकवाड,**
**माजी ग्रंथालय व माहिती अधिकारी,**
**केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र, पुणे**

# प्रतिज्ञेतला, कवितेतला आणि वास्तवातला भारत!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मी, डॉ. भारत कऱ्हाड - एक साधा शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य आणि प्रशासक. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी, उद्योग-व्यापारातील सहकारी आणि समाजमाध्यमांपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतच्या नव्या जगातून शिकत असतो. पण रोज सकाळी मुलांबरोबर उभा राहून प्रतिज्ञा म्हणताना माझ्या मनात एकच विचार घोळत राहतो - हा प्रतिज्ञेतला भारत आणि आपण अनुभवतो तो वास्तवातला भारत यात किती मोठा फरक आहे!

मुलांच्या निरागस ओठांवरून उच्चारले जाणारे शब्द माझ्या मनात एका आदर्श भारताचं स्वप्न जागं करतात. भारत माझा देश आहे, सर्व भारतीय माझे बांधव आहेत, माझ्या देशावर माझं प्रेम आहे ही प्रतिज्ञा फक्त एक वाक्यरचना नाही, तर आपल्या राष्ट्रीय जीवनाचा ध्येयदर्शक आहे. त्यात बंधुभाव, समता, प्रामाणिकपणा, निष्ठा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचा स्पष्ट आग्रह दिसतो. प्रतिज्ञेतला भारत म्हणजे प्रत्येक नागरिकाला देशाच्या उन्नतीत स्वतःचं सुख शोधणारा, संस्कृतीचा मान राखणारा आणि इतरांच्या सुखात आपलं सुख मानणारा आदर्श भारत.

पण भारत केवळ प्रतिज्ञेत मर्यादित नाही. आपल्या कवींनीही या मातृभूमीला आपल्या लेखणीतून जिवंत रंगवले आहे. केशवसुत, आधुनिक मराठी कवितेचे जनक, यांच्या तुतारी या कवितेत स्वातंत्र्याची हाक औजस्वीपणे घुमते- एक तुतारी द्या मज आणुनी, फुंकिन मी जी स्वप्राणाने गुलामगिरीच्या जुलूमाविरुद्ध हे आवाहन भारताला झोपेतून जागं करतं. त्यांच्या भारतदर्शनात एक क्रांतीशील, लढाऊ आणि आत्मभान जागवणारा योद्धा उभा राहतो.

दुसरीकडे राजा बढे यांच्या लेखणीत भारताची सांस्कृतिक गर्जना उमटते. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा या गीतामागे केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर संपूर्ण भारताचा अभिमान आणि सामर्थ्य दडलेले आहे. त्यांच्या दृष्टीने भारत म्हणजे कला, साहित्य, संगीत आणि मानवतेच्या संदेशाने भरलेलं विशाल विश्व आहे.

ग. दि. माडगूळकर (गदिमा) यांच्या कवितेत मात्र भारताचं वेगळंच रूप उभं राहतं. श्रमिकांचा घाम, शेतकऱ्यांची मशागत, कामगारांची मेहनत आणि साध्या माणसाचा संघर्ष - ह्याच्यात भारताचं खरं सौंदर्य आहे, असं गदिमा ठाम सांगतात. त्यांचं भारतदर्शन हे मातीशी, श्रमाशी आणि घामाच्या थेंबांशी नातं जोडणारं आहे.

तर इंदिरा संत यांच्या कवितेत भारतभूमी मातेसमान भासते. ही माती आईचिये पोटीची, तिच्या कुशीत उगवला जीव सारा या त्यांच्या ओळींमध्ये करुणामयी, वात्सल्यमय भारतमातेचं दर्शन होतं. त्यांच्या लेखणीत भारत म्हणजे प्रेम, माया आणि मातृत्वाने व्यापलेली कुश, जिथे सारे जीव जन्माला येतात.

अशा प्रकारे कवींनी रेखाटलेला भारत हा कधी क्रांतीशील, कधी सांस्कृतिक, कधी संघर्षशील तर कधी मातृत्वमय - अशा असंख्य छटांनी नटलेला आहे.

आज आपण पाहतो तो आधुनिक भारत या सर्व छटांचा संगम आहे. एका बाजूला विज्ञान-तंत्रज्ञानातील चंद्रयान, मंगळयान मोहिमा; माहिती-तंत्रज्ञानातील जागतिक नेतृत्व; औषधनिर्मितीतील योगदान; आणि ऑलंपिकमध्ये पदकं जिंकणारे खेळाडू - या सगळ्यामुळे भारत जगाच्या नकाशावर तेजाने झळकत आहे. दुसरीकडे मात्र अजूनही दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा यांसारख्या समस्या देशाला त्रस्त करतात. शहरं मेट्रोच्या वेगाने धावत आहेत, डिजिटल इंडिया झगमगत आहे, पण खेडी अजूनही पाण्याच्या टंचाईशी झगडत आहेत; शेतकरी अजूनही आत्महत्येच्या छायेत जगतो आहे. आधुनिक भारत म्हणजे विरोधाभासांनी भरलेला, पण संघर्षातून मार्ग काढणारा भारत.

माझ्या मते प्रतिज्ञेतला भारत आपल्याला ध्येय दाखवतो, कवींनी रेखाटलेला भारत प्रेरणा देतो, आणि वास्तवातील भारत आव्हानांना भिडायला शिकवतो. या तिन्ही रूपांचा संगमच आपल्या राष्ट्रीय जीवनाची खरी कहाणी आहे. आदर्शाशिवाय वास्तव अधुरं असतं, प्रेरणेशिवाय प्रगतीला दिशा नसते, आणि वास्तवाशिवाय आदर्श फक्त स्वप्न राहतात. म्हणूनच या तिन्हींचं संतुलन साधणं हीच खरी राष्ट्रनिर्मिती आहे.

शिक्षक म्हणून मला दररोज या तिन्ही भारतांची अनुभूती येते. मी विद्यार्थ्यांना प्रतिज्ञेतील मूल्यं शिकवतो, कवींनी लिहिलेल्या प्रेरणादायी कविता वाचायला देतो आणि वास्तवातील परिस्थितीची जाणीव करून देतो. मुलांच्या डोळ्यांत आदर्श भारताची चमक आहे, त्यांच्या मनात कवींच्या ओळींमधून आलेली प्रेरणा आहे, आणि त्यांच्या पावलांत आधुनिक भारताचं ध्येय साध्य करण्याची ताकद आहे. माझा विश्वास आहे की या तिन्ही रूपांची जाण ठेवूनच नवीन पिढी घडली, तर खरा भारत घडेल.

आज आपण सर्वांनी स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे - कुठं नेऊन ठेवला आहे भारत माझा? हा प्रश्न आपल्याला अंतर्मुख करतो. आपण जर प्रतिज्ञेतला आदर्श आपल्या जीवनात आणला, कवितेतली प्रेरणा आपल्या कृतींमध्ये उतरवली आणि वास्तवातील आव्हानांना सामोरे जात प्रामाणिक प्रयत्न केले, तर नक्कीच आपण स्वप्नातील भारत घडवू.

समारोप म्हणून एवढंच म्हणेन - भारताच्या तिन्ही छटा, प्रतिज्ञेतली आदर्शछटा, कवितेतली प्रेरणाछटा आणि वास्तवातील संघर्षछटा - या एकत्र आल्या की एक सुंदर, प्रगतीशील आणि न्याय्य भारत उभा राहील. त्या दिवसाचीच आपल्याला प्रतीक्षा आहे, जेव्हा प्रत्येक नागरिक डोकं उंच ठेवून अभिमानाने म्हणेल - भारत माझा देश आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी**

# अशिक्षित लोक ध्वजारोहणापासून वंचित राहू नये म्हणून स्वतःच्या शेतातील वसाहतीमध्ये केला स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट/प्रतिनिधी : अशिक्षित नागरिक अशिक्षित समाज ध्वजारोहणा पासून वंचित राहू नये म्हणून आपण आपल्या शेतातील वस्तीवर स्वातंत्र्य दिन समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन वंचित लोकांना सोबत घेऊन कामगार कष्टकरी लोकांना सोबत घेऊन उत्साहात ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करून या लोकांच्या जीवनात आनंद आणि उत्साह फुलविण्याचे काम येथील जुने मल्ल आणि अक्कलकोट तालीम संघाचे अध्यक्ष व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि प्रगतशील शेतकरी महेश पैलवान कुलकर्णी यांनी केले आहे. वंचित घटकांना आणि अशिक्षित लोकांना स्वातंत्र्य दिनानिमित्त बोलावून त्यांना सोबत घेऊन आपल्या शेतात सामाजिक कार्यकर्ते आणि जेष्ठ मल्ल महेश पैलवान यांनी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला.

सर्व धर्मीय अशिक्षित समाज वर्ग ध्वजारोहणापासून वंचित राहू नये म्हणून स्वतःच्या पत्नी, आई ,मित्र , कामगार वर्ग आणि शेजारील विद्यार्थी यांच्यासमवेत महेश पैलवान कुलकर्णी यांनी स्वतःच्याच वसाहती मध्ये ध्वजारोहण केले आणि समाजासमोर मोठा आदर्श घालून दिला आहे.

ध्वजारोहण झाल्यानंतर राष्ट्रध्वजास राष्ट्रगीताने मानवंदना देऊन सर्वांना बुंदीचे लाडू वाटून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या . यापैकी काही वृद्ध महिला व पुरुषांनी आपल्या जीवनात पहिल्यांदाच राष्ट्रध्वजास सलामी देण्याचा योग तुमच्यामुळे घडून आला अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. असे देशभक्तीपर , सामाजिक राष्ट्रीय कार्यक्रम गोरगरिबांना घेऊन आपल्या येथे साजरा करण्याचा मानस अक्कलकोट तालुका तालीम संघाचे अध्यक्ष श्री महेश पैलवान कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे.

**सर्व धर्मीय अशिक्षित समाज वर्ग ध्वजारोहणापासून वंचित राहू नये म्हणून स्वतःच्या शेतातील वस्तीवर आपण पत्नी, आई ,मित्र , कामगार वर्ग आणि शेजारील विद्यार्थी यांच्यासमवेत स्वातंत्र्य दिन साजरा केला आहे अनेक लोकांना झेंडा वंदन म्हणजे काय हे माहिती नाही. स्वातंत्र्य दिन म्हणजे काय हे माहिती नाही. म्हणून आपण समाजातील सर्व वंचित घटकांना आणि दुर्बल लोकांना सोबत घेऊन आपल्या स्वतःच्या वसाहती मध्ये ध्वजारोहण केले आहे.**

**– महेश पैलवान कुलकर्णी**
**अक्कलकोट**

याप्रसंगी श्रीमंत मोरे, श्रावण मोरे ,दुशलाबाई मोरे , रेहाना तांबोळी ,इस्माईल तांबोळी, लैला शेख,सुनीताबाई ,राजू कोळी मेकॅनिक अंबणा गवंडी मिस्त्री, मारुती मुळे महादेव मोरे , पद्मावती कुलकर्णी, वर्षा बाई देशपांडे, विद्यार्थी वर्गआणि स्वतः श्री महेश पैलवान कुलकर्णी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ गायत्री कुलकर्णी हे उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापुरात कंत्राटदारांचे भव्य आंदोलन : जिल्हाधिकाऱ्यांसमोर शिष्टमंडळाची सविस्तर चर्चा



## प्रत्येकी ₹५०,००० ची एफडी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सुपूर्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, हॉट मिक्स असोसिएशन, मजूर सहकारी संस्था आणि सोलापूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन यांच्या वतीने आज सोलापूर जिल्हा परिषदेसमोरच्या पुनम गेट येथे कंत्राटदारांचे भव्य धरणे आंदोलन झाले.

गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित असलेली देयके शासन देत नसल्यामुळे कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. वित्तीय संस्था दमदाटी करून वसुली करत असून, कंत्राटदारांचे सिबिल खराब होत आहे, अशी परिस्थिती यावेळी निदर्शनास आणून देण्यात आली.

या आंदोलनास काँग्रेस पक्षानेही पाठिंबा दिला. जिल्हाध्यक्ष शांतलिंग शटगार, शहराध्यक्ष चेतन नरोटे व सरचिटणीस विनोद भोसले यांनी मंडपात येऊन लिखित पत्राद्वारे समर्थन जाहीर केले.

राज्यातील ३५ जिल्ह्यांत अशा आंदोलनांचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्हाधिकारी यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करून विषय शासन दरबारी मांडण्याचे आश्वासन दिले. तसेच मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सोलापुरात आल्यानंतर भेट आयोजित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या आंदोलनात जलजीवन मिशनसह इतर विभागांशी निगडित कंत्राटदारांच्या समस्या मांडण्यात आल्या. आंदोलनात राज्याध्यक्ष मिलिंद भोसले, माजी राज्याध्यक्ष दत्तात्रेय मुळे, संतोष कलगुटगी, शंकर चौगुले, शिवानंद पाटील, रामभाऊ धुधाळ यांच्यासह जिल्हाभरातून मोठ्या संख्येने कंत्राटदार सहभागी झाले.



## कोठुरे स्वा. सावरकर विद्यालयात समाज दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे म. वि. प्र. समाज दिन साजरा करण्यात आला शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचून शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवाहात आणणारे आणि बहुजन हिताय बहुजन सुखाय ब्रिद अंगी बानवणारे संस्थेचे संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती समाज दिन म्हणून साजरी केली जाते ,कार्यक्रमाला उपस्थित शालेय समितीचे सदस्य बाळकृष्ण मोगल, प्रकाश टर्ले,नीलम आभाळे ,प्रकाश कोरडे ,रवींद्र कोरडे सुयोगभाऊ गीते, तुषार मोगल ,सुधाकर मोगल, डॉ. रामदास मोगल, होते रविंद्र दिघे, नवनाथ वाघ,विष्णू मोगल हे उपस्थित होते, म वि प्र समाज ध्वजाचे ध्वजारोहण शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रकाश कोरडे यांच्या हस्ते करण्यात असून उपस्थित पाहुण्यांच्या वतीने रांगोळी स्पर्धा पुष्परचना स्पर्धा यांचे उद्घाटन करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य बाळकृष्ण मोगल हे होते तर प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस एल यांनी केले कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी कर्मवीरांच्या कार्याबद्दल शालेय विद्यार्थ्यांनी व ज्येष्ठ शिक्षक सानप, खरात , तसेच.,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य सुयोग गीते, सुधाकर मोगल यांनी आपले मनोगत व्यक्त केले,

### कर्मवीर रावसाहेब थोरात यांची जयंती उत्साहात

वार्षिक गुणगौरव सोहळा व समाज दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले , अनेक दानशूर व्यक्तींनी विद्यालयासाठी वेगवेगळ्या प्रकारची बक्षीस योजना दरवर्षाप्रमाणे सुरू ठेवलेली असुन त्यांचे स्वागत व आभार व्यक्त करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी कर्मवीरांच्या त्यागाची व त्यांच्या दूरदृष्टी विषयी आपले कल्पक विचार मांडले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती झोमान व भडांगे के आर यांनी केले

## शिंदे डेंटल क्लिनिकचे उद्घाटन मा. खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या हस्ते संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री शिंदे डेंटल क्लिनिकचे उद्घाटन डेक्कन पुणे येथे मा. खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांच्या शुभहस्ते व प्रमुख उपस्थिती मा. संजय कोकाटे, सह पत्नीक उपस्थित होते. उपस्थितीत सर्व मान्यवर मंडळींच्या श्री शिंदे डेंटल क्लिनिक डेक्कन पुणे येथे मोठ्या उत्साहात उद्घाटन संपन्न झाले.

## विनया ( विद्या) भोईर यांचा सेवा निवृत्ती सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : विनया ( विद्या) गुरुनाथ भोईर यांचा सेवा निवृत्ती सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. भोईर या उच्च शिक्षित असून युसुफ मेहेरअली मेमोरियल एज्युकेशन सोसायटीच्या युसुफ मेहेरअली विद्यालय ताडदेव मुंबई येथे माध्यमिक विभागात मुख्याध्यापिका पदावर कार्यरत होत्या.समाजवादी विचार सरणीच्या या शाळेत भोईर बयांनी अतिशय उत्कृष्ट काम करुन शैक्षणिक प्रवाहातून विद्यार्थ्यांसह समाज प्रबोधनाचे प्रभावी कार्य केले.ताडदेव सारख्या विभागातील घराघरात शिक्षणाची गंगा पोहचविण्याचे काम त्यांनी केले.याकामी त्यांचे पती प्रा.गुरुनाथ भोईर यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले.



सदर कार्यक्रमाला साहित्यिक शुक्राचार्य गायकवाड, जयवंत सोनावणे, डॉ.मोहिते गोठणकर, डॉ.सुनील कांबळे,अभिमन्यू भालेराव ,सुखदेव धेंडे , विद्याधर जाधव,कुमार उबाळे सर,बी.डी. गायकवाड ,डॉ. संघमित्रा जाधव डॉ.प्रकाश बनसोडे, डॉ.विष्णू बनसोडे या उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी भोईर यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत चव्हाण यांनी केले.

## खरोसा येथे शिव पार्वती विवाह सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील खरोसा येथे श्रावणात दरवर्षी सर्वधर्मिय विश्वशांती अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळा आयोजीत केला जातो ,या सर्वधर्मिय अखंड विश्वशांती शिवनाम सप्ताहात दैनंदिन पहाटे शिवपाठ, रुद्राभिषेक, परम हंसय पारायण शिवभजन शिवकथा, शिवपाठ, शिवजागर सह शिवकिर्तनाचे आयोज करण्यात येते व गावात सात दिवस भक्तीमय वातावरणात शिव नामस्मरन करत शिवभक्त हा विश्वशांती शिवनाम सप्ताह साजरा करतात.



खरोसा येथील शिवनाम सप्ताहात दररोज रुचकर अशा महाप्रसादाचे आयोजन सप्ताह समिती व खरोसा ग्रामस्थांच्या वतिने अन्नदान केले जाते. सप्ताहात सात दिवस शिव भक्त परायण गुरुवर्य शिवकथाकार विश्वनाथ स्वामीजी पेनुरकर यांच्या सुश्राव्य वानितुन शिवकथेचे आयोजन करण्यात आले आहे. सह वादक संगितकार व गायनाचार्य तालमणी नागेश महाराज, गायनाचार्य कपिल महाराज करंजीकर, सिंधवादक संजय महाराज घाटनांदुरकर यांच्या संगितमय शिवकथेचे आयोजन करण्यात आले आहे , कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा कथा सौजन्य शेषेराव नरसिंगराव बिराजदार( दादा) कथा सौजन्य बाळासाहेब सांगवे, व्यंकटराव राउतराव ,संतोष बिराजदार, प्रशांत राउतराव, राहूल डोके, बालाजी जाधव, अजित डोके,माधव सांगवे, शिवप्रसाद बिराजदार, बालाजी जाधव, मनोज पांचाळ, मोहन नरवटे, लक्ष्मन बिराजदार, ईश्वर नरवटे, शरद डोके, सरपंच प्रशांत डोके, उपसरपंच विशाल क्षिरसागर, चेअरमन अमोल सांडूर उपस्थित खरोसा ग्रामस्थ व शिवभक्त

## निफाड एज्युकेशन ॲन्ड सोशल फाउंडेशन तर्फे तीन दिवसीय मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरात नागरिकांच्या आरोग्यविषयक सजगतेसाठी एक स्तुत्य उपक्रम निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशन, श्रीराम क्लासेस निफाड, तसेच मेडिकेअर इंडिया एल.एल.पी यांच्या संयुक्त विद्यमाने, संस्थापक प्रा. उल्हास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तीन दिवसीय मोफत 'लुमि राइज थेरपी' आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हे शिबिर दि. १६, १७ व १८ ऑगस्ट २०२५ रोजी उगाव रोड, निफाड येथे संपन्न झाले.

शिबिरात ४०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत लुमिराइज थेरपीचा लाभ घेतला. सहभागी नागरिकांनी आपल्या अनुभवातून या थेरपीमुळे प्रकृतीत सकारात्मक बदल झाल्याचे समाधानकारक अभिप्राय या प्रसंगी दिले



**लुमिराइज थेरपीचे उल्लेखनी फायदे:-**

पेशींमधील कार्यक्षमता सुधारते, हाडे व स्नायू अधिक बळकट होतात., मणक्याची नैसर्गिक ठेव सुरक्षित राहते., शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत, नैसर्गिक उपचारशक्ती वाढते, पचन, श्वसन आणि उत्सर्जन या क्रिया नियंत्रित होतात.

या शिबिरात लुमिराइज मेडिकेअरचे ॲडमिन डायरेक्टर डॉ. गायकवाड, गणेशगिरी महाराज, राजेंद्रजी थोरात, दिलीफ कापसे, संजय गाजरे, डॉ. निचलानी, तसेच निफाड एज्युकेशन अँड सोशल फाउंडेशनचे संचालक मंडळ व श्रीराम क्लासेसचे शिक्षकवृंद यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर. जे. डान्स अकॅडमी झुंबा फिटनेस क्लासेसचे संस्थापक ऋषिकेश जगताप यांचे विशेष सहकार्य लाभले.

या उपक्रमाचे संपूर्ण संयोजन प्रा. उल्हास पाटील व प्रा. सविता पाटील यांनी प्रभावीपणे पार पाडले.

आरोग्यविषयक जनजागृती व प्रत्यक्ष लाभ मिळवून देणारा हा उपक्रम निफाडमधील नागरिकांसाठी आरोग्यदृष्ट्या लाभदायक व प्रेरणादायी ठरला, असे मत सहभागी नागरिकांनी यावेळी व्यक्त केले.

### या किर्तनकारावर कठोरात कठोर कारवाई ची निवेदनाद्वारे मागणी

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात धमकी प्रकरणी निफाडला युवक काँग्रेसचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व सुसंस्कृत राजकारणी म्हणून ज्यांची देशाला ओळख आहे असे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांना धमकी देऊन, स्वतःला कीर्तनकार प्रवचनकार, म्हणवणाऱ्या तथाकथित व्यक्तीविरुद्ध निफाड युवक काँग्रेसने उपविभागीय कार्यालयाकडे निवेदन दिले आहे. सदर तथाकथित कीर्तनकार हे वारकरी संप्रदायाच्या आडून विशिष्ट अजेंडा राबवण्याचा प्रयत्न करत असून समाजात तेढ निर्माण होईल अशी वक्तव्य आपल्या भाषणातून करत आहेत.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या करणाऱ्या गोडसेचा उल्लेख नथुरामजी असा आपल्या व्हिडिओतून करत आहेत.या समाज विघातक प्रवृत्तीच्या विरोधात गृहमंत्र्यांनी दखल घेऊन संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश यंत्रणेला द्यावे. अशी विनंती युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली या निवेदना प्रसंगी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे, विनायक शिंदे, शहराध्यक्ष स्वप्नील बिनायकिया, तालुका सरचिटणीस सुहास सुरळीकर, तालुका उपाध्यक्ष अली भाई शेख, ज्येष्ठ नेते संपत कराड,प्रभाकर हुजबंध, बाळासाहेब खालकर, युवा उपाध्यक्ष तौसिफ राजे, युवा शहर उपाध्यक्ष अमीन कुरेशी, आसिफ मन्सूरी, सोपान वाघ आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### 'वृक्ष माझा सखा' तोच माझा पाठीराखा...!

## सामाजिक-निसर्ग जाणिवेची बांधीलकी : शासकीय मुलांची निवासी शाळेचा उपक्रम 'वृक्षा-रक्षाबंधन'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : समाज, परिवार आणि सगेसोयरे सर्व त्यागून जगदगुरु संत तुकोबा रायांच्या अभंगातील ओळी या सामाजिक, नैसर्गिक बांधीलकी जोपासणे ही मानवाची जबाबदारी आहे असे सांगतात. आणि हे खरेच सत्यामध्ये उतरविण्यासाठी नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आक्सिजन देऊन माणसांना जगविणरे वृक्षांना राखी बांधून सामाजिक सलोखा राखला आहे. निसर्ग आपला सखा आहे. याची जाणीव या उपक्रमातून घडवून दिली. म्हणून संत तुकाराम महाराज यांच्या या ओळी सार्थकी ठरतात. वृक्ष माझा सखा' तोच माझा पाठीराखा...! असे म्हणावेच लागते.

लोकपरंपरा आणि आपला सांस्कृतिक वारसा जपणे हे प्रत्येक मानवी संस्कृती जपणारे नागरिकांचे कर्तव्य आहे. असाच हा एक उत्सव रक्षाबंधन (राखी) आहे. मोठ्या आनंदाने बहीण ही भावाला ओवाळणी घालून रक्षाबंधन बांधून रक्षा करावी अशी मनोकामना करते. हा दृष्टांत ठेवून शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील वर्ग सहावी ते दहावीच्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी झाडांची म्हणजे वृक्षांची रक्षा करण्यासाठीरक्षाबंधने बांधली. वृक्षांची संवर्धन करावी, झाडे लावावी-झाडे जगवावी, वृक्षांची कत्तली होणार नाही. असेही याप्रसंगी सांगण्यात आले. सुट्टीचा उपक्रम म्हणून राबवून साजरा करण्यात आला आहे.

**टाकाऊ पासून टिकाऊ व राखी प्रदर्शनी**

सदर शाळेत राखी स्पर्धा घेण्यात आली. सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कला, कौशल्य अवगत करून, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करावे म्हणून रक्षाबंधन तयार केली गेले. यामध्ये तिरंगा राखी, पतंग, स्टोन, कार्टून स्माईल, धागा राखी, झेबू राखी, फ्लावर राखी, सर्कल राखी, मणी राखी, कागदी राखी, रिबन राखी, गुलाब फूल राखी, अशाप्रकारे प्रत्येक वर्गांनी वर्ग शिक्षकांच्या मार्गदर्शनात तयार करून प्रदर्शनी केली. सदर उपक्रम राबविण्यासाठी शाळेतील शिक्षक नीता भलमे, साधना पारधी, कार्तिक शहारे यांनी मेहनत घेतली असून 'निसर्ग माझा सखा, करु वृक्ष-रक्षाबंधन' ही संकल्पना शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी रोवली आणि उत्साहाने राबविण्यात आली.

**वृक्ष- रक्षाबंधन व ओवाळणी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे मुलांनी स्वत: रक्षाबंधन तयार करुन शालेय परिसरातील वृक्षारोपण करून जगविलेल्या झाडांना वृक्षाबंधन बांधून रक्षाबंधन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षांची पुजा केली, गंध टिळा लावण्यात आले असून वृक्षांची ओवाळणी करण्यात आली. असे वृक्ष-रक्षाबंधन करण्यात आले. हा अनोखा सामाजिक बांधिलकी जोपासणारा व निसर्ग माझा सखा हे पाळतांना नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.

# पंढरपूर पोलिसांची सुगंधी तंबाखू विक्री करणाऱ्यावर कारवाई

## गुन्हा दाखल, मुद्देमाल जप्त; पंढरपूर पोलिसांची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १८/८/२८२५ रोजीपहाटे गोपनीय बातमीदार बाबत बातमी मिळाली की, पंढरपूर शहरांमध्ये सुगंधी तंबाखू वैदरीत्या विक्री करणारा आहे. सध्या सदरच्या संबंधित तंबाखू पंढरपूर शहरातील वसीम निसार तांबोळी, रा. अकबर अली रोड पंढरपूर यांच्या घरी आहे. असे मिळाले बातमीच्या आधारावर वसीम तांबोळी यांच्या राहत्या घरी जाऊन तपासणी केली असता. सदर ठिकाणी संबंधित तंबाखू असल्याचे तीन पांढऱ्या रंगाची पोती मिळून आली. सदर पोत्यामध्ये पाचशे ग्रॅम वजनाचे सीलबंद सुगंधी तंबाखूचे पुढे असल्याचे निदर्शनास आले. सदर पाकिटे फोडून पाहिल्यास सुगंधी तंबाखूचा वास येत असल्याचे




आढळून आलेने त्यांच्यावर पंढरपूर शहर पोलीस ठाणे गु.र.न.५१०/२०२५ अन्य व सुरक्षा नामके अधिनियम २००६ चे कलम२६(२)(!),२७(३)(९),(३०) (२)(र)५९ भारतीय न्याय संहिता कलम२२३,२४७,२७५,१२३, प्रमाणे गुन्हा दाखल केला असून. सदर ठिकाणी मिळून आलेल्या मालाचे वर्णन खालील प्रमाणे.

१)२,२३,०००/रुपये किमतीचे तीन पांढऱ्या रंगाची पोती त्यामध्ये प्रत्येक पोत्यामध्ये ५०० स मोजण्याचे २२३ पाकिटे प्रत्येकी एक हजार रुपये किम तीचे असे एकूण

२,२३,०००/-

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी सो.मा. अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम कुमार यावलकर, मा. सह पोलीस अधीक्षक, श्री प्रशांत डंगळे, पंढरपूर उपविभाग, पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके , पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश रोंगे, विनोद शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल लोंढे शिवशंती हुलजंती, राजश्री कटके, शोभा कदम यांनी केले.



# ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनतर्फे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव/पिंपरी चिंचवड : ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या वतीने स्वातंत्र्य दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी पशूसंवर्धन महाराष्ट्र राज्याच्या मा.डॉ यशोधरा नितनवरे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांच्या शुभहस्ते तिरंगा ध्वज फडकविण्यात आला.

ध्वजारोहणानंतर संस्थेचे अध्यक्ष कैलास गहिनीनाथ बन्सोडे यांनी स्वातंत्र्य दिनाचे ऐतिहासिक महत्व अध-ोरेखित करताना स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांचे स्मरण केले. आजची पिढी ही स्वातंत्र्याची खरी वारसदार असून सम ाजहितासाठी निःस्वार्थीपणे कार्य करणे हेच स्वातंत्र्याचे खरे मूल्य आहे, असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, महिला मंडळ, युवकवर्ग तसेच लहान मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राष्ट्रगीताच्या सामूहिक गजराने परिसर देशभक्तीच्या भावना व्यक्त करणारा झाला. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेच्या महेंद्र गजभिये, आगंदा चव्हाण, सत्यवान मोरे, जयवर्धन कांबळे, रीतेश बाराथे, पोपट केंजळे, सुरेखा बनसोडे, प्रमिला इनामदार, शितल गायकवाड, नूतन सोनवणे, नेहा क्षीरसागर, विद्या कांबळे, वैशाली कांबळे, जयश्री कांबळे, प्रतिभा मोरे, आशा चव्हाण, सुजाता निकाळजे,या सर्व पदाधिकाऱ्यांनी संयोजन केले. शेवटी उपस्थित पाहुण्यांचे आभार मानून सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# वागदरी येथून मराठा आरक्षण आंदोलनास बहुसंख्येने कार्यकर्ते मुंबईला जाणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वा खाली दि २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे आयोजित मराठा आरक्षण आंदोलनास वागदरी ता.तुळजापूर येथून बहुसंखेने कार्यकर्ते जाणार असल्याचे बैठकित ठरले.

वागदरी येते मराठा आ-रक्षण आंदोलनाचे वागदरी समन्वयक व्यंकट पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील महादेव मंदीराचा सभागृहात मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे या मागणी करिता मराठा आ-रक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेत्रत्वाखा-ली मुंबई येथील अजाद मैदानावर दि.२९ आंगस्ट रोजी आयोजित आंदोलनात सहभागी होण्यासाठी पूर्व तयारी करण्याकरिता वागदरी येथे एक बैठक सपन्न झाली. या बैठकीत येथून बहूसंखेने कार्यकर्ते जाणार असल्याचे ठरले.

## श्रावण महिन्यातील जागृत देवस्थान यल्लमा देवीची यात्रा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जागृत देवस्थान यल्लमा देवीची श्रावण महिन्यातील चौथ्या मंगळवारी मोठी यात्रा भरते. श्रावण महिन्यातील यात्रेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले होते. सध्या दोन तीन दिवस झाले पाऊस असल्यामुळे भाविक भक्तावर पा-वसाचा परिणाम दिसून आला. यल्लमा देवी ट्रस्ट कडून अनेक सुख सुविधांचे नियोजन करण्यात आले होते.

# पडघा येथे स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात आंमली पदार्थ सेवन विरोधात जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात पोलीसांकडून आंमली पदार्थ सेवन विरोधात जनजागृती करण्यात आली. पडघ्यात ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी पडघा जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात पडघा ग्राम पंचायतीच्या उपसरपंच नयना जाधव यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. तर ग्रामपंचायत प्रांगणात सरपंच रविंद्र विशे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. यावेळी ग्राम पंचायत सदस्यासह नागरीक व ग्राम पंचायत अधिकारी भास्कर घुडे उपस्थित होते.

यावेळी आंमली पदार्थाचे सेवन केल्याने होणारे दुष्परिणाम यांचे फलक पोलीस, नागरीकांकडुन विद्यार्थ्यांकडून झळकावण्यात आले तर यावेळी पडघा पो-लीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक दिलीप देशमुख यांनी आमली पदार्थ सेवन केल्याने मानवी जिवनावर, मनावर, शरी-रावर, तरुणाईवर, समाजावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती दिली तसेच आंमली पदार्थ विक्री व त्यासंबंधी कुणाला काही माहिती



पोलिसांना द्यायची असल्यास त्या व्यक्तीचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असल्याचे पोलीसांकडून सांगण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायतीच्या वती-ने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तर नागरीकांसाठी अल्पोप-हार, पिण्याचे पाणी, चहाची व्यवस्था करण्यात आली होती.

# पत्रकार सुनिल अंभोरे यांचा वाढदिवस चक्क स्मशानभूमीत साजरा !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथील सार्वजनिक स्मशानभूमी कडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले आहे.स्मशानभूमी म्हटले की, लोकांच्या डोळ्यापुढे येथे ती प्रेत यात्रा, प्रचंड जनसमुदाय,स्मशानभूमीतील पडकं शेड,स्मशान शांतता,आक्रोश मात्र मेरा बुद्रुक येथील सार्वजनिक स्मशानात आता चक्क वाढदिवस साजरे होत आहे हे नवलच! जसे जग बदलत चालले आहे तशाच सर्व गोष्टी बदलत चालल्या आहेत.हे आपण पाहत आहोत,अनुभवत आहोत आणि स्वीकारत सुद्धा आहोत. आताच्या वाढदिवसाच्या सुरुवा-तीला वाढदिवस हे ठराविक मर्यादित साजरी केली जायचे मात्र, आता वाढदिवसाचे फॅड झाले आहे असेच आपण म्हण-तो. वाढदिवस म्हणजे केवळ उत्सव ,मज्जा आणि धमाल नव्हे.हा दिवस असतो स्वतःला तपासून घेण्याचा, समाजसापेक्ष कृतीचा,याच भावनेतून पत्रकार सुनिल अंभोरे यांनी स्वतःचा वाढदिवस चक्क स्मशानभूमीत साजरा केला.

> **स्मशान भूमी ही जागा पवित्र,लोकांच्या मनामधील अंधश्रद्धा दूर करण्याचा एक छोटासा प्रयत्न – पत्रकार सुनील अंभोरे**



पत्रकार सुनिल अंभोरे हे विविध क्षेत्रात वेगवेगळ्या पदावर काम करून सामाजिक चळवळीमध्ये त्यांचे योगदान आहे. आतापर्यंत त्यांना समाजरत्न, जीवनगौरव, समाज भूषण, पुरस्कार अशा अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.आपल्या समाजात वाढलेली अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करण्यासाठी आपला वाढदिवस साजरा करत पत्रकार सुनिल अंभोरे यांचा मानस होता.मृत्यू हा अटळ आहे. किंबहुना अंतिम सत्य तेच आहे.त्या सत्याचा मिलाप होतो तो स्मशानभूमीतच.मग ती जागा अशुभ कशी? स्मशानभूमी बाबतचे गैरसमज अंधश्रद्धा दूर होण्यासाठी सुनिल अंभोरे यांनी वाढदिवस स्मशानभूमीत हा आगळावेगळा उपक्रम राबविला आहे. सध्याच्या घडामोडीत वाढदिवसाला तरुण,तरुणी रस्त्यावर केक कापून मौज,मजा करताना दिसतात.पण पत्रकार सुनिल अंभोरे यांनी स्मशानभूमीत वाढदिवस साजरा केला. लोक स्मशानभूमीत यायला भीत असतात.पण ही पवित्र जागा आहे, इथे सर्वांनाच यायचे आहे. स्मशानभूमीत कोणाचाही भेदभाव नाही श्रीमंत असो किंवा गरीब कुठल्याही जाती धर्माचा इथे जातिवाद नाही शेवटी सर्वांना याच जागी यायचे आहे.म्हणून मी सरकारी सार्वजनिक स्मशानभूमी येथे वाढदिवस साजरा केला श्रद्धा ठेवा मात्र अंधश्रद्धा नको हा संदेश पत्रकार सुनील अंभोरे यांनी यातून दिला आहे. स्मशानभूमीम ध्ये शुभेच्छा देण्यासाठी शेकडो लोकांनी गर्दी केली होती. पत्रकार सुनिल अंभोरे यांना काहींनी पुस्तके भेट दिली, काहींनी शाल, श्रीफळ, पुष्प, पुष्पहार,रुमाल टोपी, केक,पेढे भरविले. तयांच्यासोबत त्यांच्या सहकार्याने सुद्धा स्मशानभूमीतच अल्पोपहार केला.स्मशानभूमीत आज पहिल्यांदाच फटाक्याची आतिषबाजी झाली, रंगांची उधळण, पुष्पाचा वर्षाव आनंदाच्या क्षणी झाला.पहिल्या वेळेस टाळ्यांचा कडकडाट, पहिल्याच वेळेस गदागदा असणारे प्रसन्न चेहरे स्मशानभूम ीने पाहिले.डोक्यातून काही प्रमाणात अंधश्रद्धा नक्कीच निघून गेली. मृत्यू हा सत्य आहे आणि तो स्वीकारावेच लागेल एक ना एक दिवस त्याला समोर जावेच लागेल हे जर मान्य केले तर जीवन आनंदात जगू शकतो हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. या स्मशानभूमीतील आगळ्यावेगळ्या वाढदिवसाला गावातील नागरिकासह, राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, क्षेत्रा-तील मान्यवर, पत्रकार मंडळी सह तरु-णाची उपस्थिती होती.

> **स्मशानभूमीत वाढदिवस साजरा करून ज्या मागे सम ाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचा आणि मृत्यू हे जीवनातील अंतिम सत्य आहे याची जाणीव करण्याचा उद्देश मी सार्थ केला.स्मशानभूमी हे मृत्यूचे अंतिम सत्य दर्शविते त्यामुळे या ठिकाणी मी माझा वाढदिवस साजरा केला आणि एक छोटासा प्रयत्न अंधश्रद्धा दूर करण्याचा केला.**
> **– सुनिल अंभोरे, पत्रकार मेरा बुद्रुक**

## शेतकरी शंकर सानप यांची तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी

# अंढेरा महसूल अधिकारी यांना मुख्यालयाचे वावडे, सातबारा उतारा देण्यास टाळाटाळ!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा येथील शेतकऱ्याला सातबारा उतारा साठी आठवडा भर झुलवत ठेवल्याने तसेच सद्य स्थितीत सर्वत्र पूर परिस्थिती असतांना अंढेरा भाग १ चे ग्राम महसूल अधिकारी तेजस शेटे हे मुख्यालयी न राहता ३४ किमी वर तालुका मुख्यालयी राहत असून यांच्या त्रासाला कंटाळून आठ दिवस फरफट झाल्याने अंढेरा येथील शंकरराव सानप यांनी १८ऑगस्ट रोजी रीतसर चौकशी करून सर्व पुरावे आहेत ते तक्रारीत नमूद करण्यात आले आहे व सादर करण्याची तयारी सुद्धा असून त्यात




तथ्य आढळल्यास कार्यवाही करण्याची मागणी तहसीलदार देऊळगाव राजा यांच्या कडे १८ऑगस्ट रोजी केली आहे.

याबात सविस्तर असे की दिलेल्या निवेदनात शंकरराव सानप यांनी म्हटले आहे की देऊळगाव राजा तालुक्यातील नंबर तिन चे गाव असून अंढेरा भाग १चे ग्राम महसूल अधिकारी तेजस शेटे सातबारा उतारा साठी ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट पर्यंत झुलवत ठेवल्याचा दिनक्रम तक्रारीत नमूद करण्यात आला असून त्याचे सर्व पुरावे त्यांच्याकडे असल्याचे नमूद केले आहे तसेच अंढेरा गावाला दोन नद्यांचा वेढा आहे महसूल व आ-पत्ती व्यवस्थापन सद्या अलर्ट मोडवर असतांना हे ग्राम महसूल अधिकारी मुख्यालयी न राहता तालुका मुख्यालयी राहतात तसेच शेतकरी वर्गांना सातबारा उतारा देण्यासाठी झुलवत ठेवतात. तसेच मोबाईल वेळोवेळी बंद ठेवतात तसेच तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे सहाय्यक म्हणून काम करतात परंतु त्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडला? अंढेरा येथील दोन नद्यांच्या उगमावरील धरणे शंभर टक्के भरून वाहत आहेत.तसेच लाभार्थी यांना मुजोर पणे बोलतात. यांना वरद हस्त कुणाचा अंढेरा गा-वाला पोलीस स्टेशन आहे. त्यामुळे येथे पन्नास खेड्याच्या संपर्क असतो नैसर्गिक आपत्ती निर्माण झाल्यास यांना कुठे शोधावे?तसेच माझे लॅपटॉप महसूल सहायक यांच्याकडे आहे हे वागणे बेजबाबदार पनाचे आहे.असे हे महसूल अधिकारी यांचे बेजबाबदार वागणे चुकीचे असून त्यांची सखोल चौकशी करून शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांना खीळ बसत असून मला दस्त मिळत नसल्याची बाब मी अंढेरा मंडळाचे मंडळ अधिकारी प्रल्हाद केदार यांना सुद्धा भ्रमणध्वनी द्वारे सांगून सुद्धा महसूल अधिकारी शेटे यांनी मला सातबारा उतारे देण्यास टाळाटाळ केली व आठवडा भर झुलवत ठेऊन मानसिक त्रास दिला असल्याचे तक्रारीत म्हटले असून त्याचे सर्व पुरावे फोन कॉल व संदेश त्यांच्याकडे असल्याचे सुद्धा त्यांनी तक्रारीत शंकरराव सानप यांनी नमूद केले असून तहसीलदार वैशाली डोंगरजाळ आता काय कार्यवाही करतात याकडे परिसराचे लक्ष लागले आहे एवढे मात्र खरे!

## फसवणूक प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) फसवणूक प्रकरणी दोन जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना २४ मार्च २०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय येथे घडली. याप्रकरणी अनिरुद्ध नंदकुमार जो-शी (वय-५०,रा.स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती,होडगी रोड) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मण काशिनाथ माळी (रा.जुळे सोल-ापूर) व सविता तुकाराम पडळकर (रा. ए ३०५ तिसरा मजला, दोस्ती बेलेझा,जीडी आंबेडकर मार्ग, परेल,मुंबई) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहिती अशी की लक्ष्मण माळी याने सन २०१४ मध्ये मौजे मजरेवाडी येथील शिवदर्शन नगर येथील जुना सर्वे नंबर ३३७ त्याचा नवीन सर्वे नंबर १९/१० पैकी ४ प्लॉट विक्री केले होते.तरी संपूर्ण गटातील जागा पुन्हा विक्री करण्यासाठी लेआउट मंजूर करून फिर्यादीच्या मालकीच्या जागेवर ड्रेनेज लाईट रस्ता करून जा-गेचे अस्तित्व संपून जाहीर प्रसिद्धी दिली.त्यामुळे विजापूर नाका पो-लीस स्टेशन ६७७/२०२३ भादवि ४१७, ४२० नुसार गुन्हा नोंद केला असून,त्याचे दोषारोपपत्र क्रमांक १६८/२४ दि.२० जुलै २०२४ अन्वये प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी कोर्ट नंबर २ सोल-ापूर येथे सादर केले असताना सुद्धा वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांचे मालकीचे चार प्लॉट गटातील सर्व ४० जागा सविता पडळकर यांना दस्त क्रमांक २२२६/२५ अन्वये पुन्हा विक्री करून फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक पो-लीस निरीक्षक कुलकर्णी हे करीत आहेत.